महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११)

# महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९

(दिनांक १५ ऑगस्ट २०१३ पर्यंत सुधारित)

**(Maharashtra Act No. XI of 1979)**

# The Maharashtra Khar Lands Development Act, 1979

*(As modified upto the 15th August 2013)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

[किंमत : ₹ १०]

# महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९

## अनुक्रमणिका


उद्देशिका.
कलमे.

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. राज्य शासनाची कर्तव्ये व अधिकार.
४. खार जमीन विकास अधिकारी.
५. मुख्य नियंत्रक प्राधिकारी.
६. योजना तयार करणे.
७. योजनेचा मसुदा आणि अंतिम योजना प्रसिद्ध करणे.
८. योजनेचा प्रारंभ व परिणाम.
९. योजनेची अंमलबजावणी.
१०. योजनेमध्ये बदल करण्याचा अधिकार.
११. योजना रद्द करण्याचा अधिकार.
१२. अधिकार अभिलेखात नोंद करणे आणि जमिनीचा कृषीतर प्रयोजनांसाठी वापर करण्यावर निर्बंध घालणे.
१३. लागवड करण्यात किंवा उपकर भरण्यात कसूर केल्यास योजनेमधील जमिनीचा भाडेपट्टा जप्त होणे.
१४. बंधाऱ्याचे पर्यवेक्षण, परिरक्षण व दुरुस्ती यासाठी ग्रामपंचायती जबाबदार असणे.
१५. सल्लागार समिती.
१६. प्रवेश करण्याचा हक्क.
१७. जमीन, हक्क किंवा हितसंबंध संपादन करणे.
१८. आनुषंगिक नुकसानीसाठी भरपाईच्या रकमेची मागणी.
१९. विवक्षित प्रकरणांत माती वापरणे किंवा ती काढून नेणे याबद्दल भरपाई न देणे.
२०. खार जमिनींवरील उपकर.
२१. खार जमिनींवर उपकर बसवणे.
२२. उपकर देण्याच्या बाबतीतील जबाबदारी.
२३. उपकर गोळा करणे व त्याची वसुली यासाठी संहितेच्या तरतुदी लागू असणे.
२४. उपकर देण्यातील कसुरीबद्दल शास्ती.
२५. उपकराची थकबाकी व शास्ती ही जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे.

## अनुक्रमणिका—समाप्त

कलमे

२६. तातडीने करणे आवश्यक असलेल्या दुरुस्त्या किंवा आवश्यक असलेली कामे पार पाडण्यासाठी विवक्षित व्यक्तींना सक्ती करण्याचे अधिकार.

२७. मासेमारीविषयक अधिकारांचे नियमन.

२८. संक्षिप्तरीत्या चौकशी करणे.

२९. योजनेशी संबंधित असलेली कागदपत्रे, आराखडा किंवा नकाशा यांची नोंदणी करणे आवश्यक नसणे.

३०. सद्‌भावनेने कृत्य करणाऱ्या व्यक्तीस संरक्षण.

३१. शास्ती.

३२. नियम.

३३. निरसन व व्यावृत्ती.

३४. १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश २ चे निरसन व व्यावृत्ती.

# सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११[१]

## महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९

[११ एप्रिल, १९७९]

[दिनांक १० एप्रिल, १९७९ रोजी राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ११ एप्रिल, १९७९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**राज्य शासनाने, स्वतः बंधारे बांधून व इतर कामे करून व ती सुस्थितीत राखून त्याद्वारे खार जमिनींचे संरक्षण व विकास करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे व भरतीच्या पाण्याखालील जमिनींचे पुन:प्रापण करणे यासाठी आणि त्यावर अधिक अन्नपिके काढणे सुलभ होण्यासाठी आणि इतर विवक्षित बाबींसाठी अधिक चांगली तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाने, स्वतः बंधारे बांधून व इतर कामे करून व ती सुस्थितीत राखून त्याद्वारे खार जमिनींचे संरक्षण व विकास करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे व भरतीच्या पाण्याखालील जमिनींचे पुन:प्रापण करणे यासाठी आणि त्यावर अधिक अन्नपिके काढणे सुलभ होण्यासाठी आणि यात यानंतर दिलेल्या इतर विवक्षित बाबींसाठी अधिक चांगली तरतूद करण्यासाठी राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जिच्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाल्याने, त्यांनी, महाराष्ट्र खार जमिनी विकास अध्यादेश, १९७९ हा, १९ फेब्रुवारी, १९७९ रोजी, प्रख्यापित केला ;

(१९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, महाराष्ट्र राज्यातील, बृहन्मुंबईस व ठाणे, कुलाबा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना लागू आहे.

(३) तो, १९ फेब्रुवारी, १९७९ रोजी, अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(अ) " लाभाधिकारी " म्हणजे, पुन:प्रापण किंवा लागवडयोग्य जमिनीत रूपांतर केल्याने किंवा इतर कोणत्याही रीतीने कोणत्याही खार जमिनी योजनेचा लाभ मिळालेल्या जमिनीचा मालक, भोगवटादार किंवा धारक ;

(ब) " संहिता " म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ; (१९६६ चा महाराष्ट्र ४१.)

(क) " बंधारा " या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो,—

(एक) कोणत्याही भरतीच्या पाण्याखालील जमिनीवर किंवा खार जमिनीवर पाणी येऊ न देण्यासाठी किंवा पाणी राहू देण्यासाठी अथवा कोणत्याही लगतच्या गोड्या पाण्याच्या नाल्यात किंवा उपखाडीत खारे पाणी जाऊ न देण्यासाठी, बांधण्यात किंवा वापरण्यात आलेला मातीचा प्रत्येक तट, धरण, भिंत आणि बांध ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ३ मार्च, १९७९, भाग पाच, असाधारण, पृष्ठ ४३ (इंग्रजी) पहा.

(दोन) कोणत्याही बंधाऱ्यास जोडलेले किंवा त्याचा भाग असलेले, प्रत्येक जलद्वार, बांध (spur), धक्का, पाणी वळवणारी भिंत, प्रतितट किंवा इतर बांधकाम ;

(तीन) कोणत्याही बंधाऱ्याच्या संरक्षणासाठी किंवा कोणत्याही भरतीच्या पाण्याखालील जमीन किंवा खार जमीन ही, भरती-ओहोटीमुळे, लाटांमुळे किंवा पाण्यामुळे धुपून जाऊ नये म्हणून किंवा पाण्याखाली बुडून जाऊ नये म्हणून तिचे संरक्षण करण्यासाठी बांधलेला किंवा उभारलेला मातीचा प्रत्येक तट, धरण बांध, भिंत, धक्का किंवा बांध (spur) ;

(चार) साठवणीच्या, निरीक्षणाच्या किंवा पर्यवेक्षणाच्या कामासाठी असलेल्या सर्व इमारती ;

(पाच) या योजनेचा भाग असलेले सर्व पोचमार्ग व इतर मार्ग ;

(ड) " भूतपूर्व मंडळ " म्हणजे, मुंबई खार जमीन अधिनियम, १९४८ याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले, महाराष्ट्र खार जमीन सुधारणा मंडळ ; १९४८ चा मुंबई ७२.

(ई) कोणत्याही जमिनीच्या संबंधात " धारक " म्हणजे, मालक किंवा कूळ म्हणून कायदेशीरपणे प्रत्यक्ष जमिनीचा कब्जा धारण करणारी व्यक्ती व त्यात शासकीय पट्टेदाराचा समावेश होतो ;

(फ) " पाटबंधारे विभाग " म्हणजे, महाराष्ट्र शासनाचा पाटबंधारे विभाग ;

(ग) " खार जमीन " म्हणजे, बंधारा बांधून समुद्रापासून किंवा भरतीचे पाणी आत येणाऱ्या नदीपासून संरक्षण करून, जी लागवडीस योग्य किंवा कोणत्याही रीतीने अन्य प्रकारे लाभप्रद करण्यात आली आहे अशी भरतीच्या पाण्याखालील जमीन आणि तीत, खार, खाजण, खारेपाट, गझनी या किंवा इतर कोणत्याही रीतीने वर्णन करण्यात येणाऱ्या अशा सर्व जमिनींचा समावेश होतो ;

(ह) " खार जमीन उपकर " किंवा " उपकर " म्हणजे, या अधिनियमान्वये जमिनींवर बसविण्यात आलेला व वसूल करण्यात आलेला उपकर ;

(आय) " खार जमीन विकास अधिकारी " म्हणजे, कलम ४ अन्वये नेमलेला कोणताही अधिकारी ;

(जे) कोणत्याही जमिनीच्या संबंधात, " भोगवटादार " म्हणजे, त्यावेळी ती जमीन कसण्याचा अधिकार धारण करणारी किंवा धारण करीत असल्याचे म्हणणारी कोणतीही व्यक्ती ;

(के) कोणत्याही जमिनीच्या संबंधात, " मालक " या संज्ञेत, जमिनीच्या मालकीमध्ये संयुक्त हितसंबध असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा समावेश होतो व या अधिनियमान्वये मालकास जो अधिकार व जी दायित्वे लागू होतील ते सर्व अधिकार व ती सर्व दायित्वे, असा संयुक्त हितसंबंध असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस, संयुक्तपणे व पृथकपणे, लागू होतील ;

(ल) " विहित " म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित ;

(म) " योजना " म्हणजे, या अधिनियमान्वये तयार केलेली खार जमीन योजना ;

(न) " समुद्र " या संज्ञेत, उपसागर, उपखाडी, खाडी किंवा समुद्राच्या एखाद्या अरुंद पट्टीचा समावेश होतो ;

(ओ) " भरतीच्या पाण्याखालील जमीन " म्हणजे, नेहमीच्या उधाणाच्या वेळी भरतीमुळे व ओहोटीमुळे झाकले जाणारे व उघडे पडणारे असे भरतीच्या पाण्याच्या तळाशी असलेले किंवा किनाऱ्याचे भाग यासहित, नेहमीच्या उधाणाच्या खूणेपासून एक मीटर उंचीपर्यंतचा समोच्च रेषेतील लगतचा, पाण्याच्या तळाखालील किंवा किनाऱ्याचा भाग ;

(प) " भरतीचे पाणी " म्हणजे, नेहमीच्या उधाणाच्या वेळी, भरती-ओहोटीच्या कक्षेत येणारा समुद्राचा किंवा नदीचा कोणताही भाग ;

(क्यू) या अधिनियमात वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या करण्यात न आलेल्या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा अर्थ, संहितेत त्यांना अनुक्रमे जो अर्थ नेमून देण्यात आला असेल, तोच असेल.

राज्य शासनाची कर्तव्ये व अधिकार.

**३.** (१) खार जमिनीचे अत्यंत कार्यक्षम व किफायतशीर रीतीने संरक्षण करणे, त्यांचा विकास करणे, त्या सुस्थितीत ठेवणे व त्यांचे नियंत्रण करणे हे राज्य शासनाचे कर्तव्य असेल.

(२) खार जमिनीच्या योजना कार्यान्वित करण्यावर होणारा खर्च, या बाबतीत केलेल्या रीतसर विनियोजनाअन्वये राज्य शासनाने सोसला पाहिजे.

(३) राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाकडून ज्या रीतीने, राज्य क्षेत्रातील लहान पाटबंधारे योजना किंवा पूर संरक्षण योजना यांसारख्या इतर योजनांची अंमलबजावणी व त्यांचे परिरक्षण होते त्याच रीतीने या योजनांची मूळ बांधकामे आणि पूर्ण केलेल्या किंवा चालू योजनांखालील बांधकामाच्या विशेष दुरुस्त्या यांची अंमलबजावणी व त्यांचे परिरक्षण त्याच विभागाकडून करण्यात येईल.

(४) पूर्ववर्ती तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, राज्य शासनास पुढील कामे करण्याचे अधिकार असतील,—

(अ) पूर्वीच्या मंडळाने यापूर्वीच केलेली विकासाची कामे व बांधकामे अधिसूचित करणे ;

(ब) पूर्वीच्या मंडळाची, जी पूर्ण करण्यात आली आहेत किंवा पूर्ण करण्यात आलेली नाहीत अशी सर्व बांधकामे, पूर्ण करण्यासाठी व चालवण्यासाठी हाती घेणे ;

(क) ज्या योजना राज्य शासनाने किंवा भूतपूर्व मंडळाने पूर्ण केल्या असतील व ज्या राज्य शासनाने आपल्याकडे घेतल्या असतील अशा योजनांखाली विकसित केलेल्या सर्व जमिनींवर, राज्य शासन प्रत्येक योजनेकरिता स्वतंत्रपणे अधिसूचित करील अशा तारखेपासून, उपकर बसवणे व तो वसूल करणे ;

(ड) सर्व खार जमिनींची भूमापने करण्याची व्यवस्था करणे आणि या अधिनियमान्वये विकसित करावयाच्या खार जमिनी योजनांची एक बृहतयोजना तयार करणे ;

(ई) पुढील गोष्टींची एक यादी तयार करणे—

(एक) सर्व खार जमीन योजना, मग त्या पूर्ण केलेल्या असोत, त्यांचे बांधकाम चालू असो किंवा त्या प्रस्तावित असोत ;

(दोन) प्रत्येक योजनेखाली लाभ मिळालेल्या किंवा संरक्षण करावयाच्या जमिनी ;

(तीन) प्रत्येक व्यक्तिगत योजनेद्वारे लाभ झालेल्या अशा जमिनीच्या मालकांची, भोगवटादारांची व धारकांची नावे ;

(फ) अंमलबजावणी, कार्यचालन व परिरक्षण यांच्या सोयीसाठी व्यक्तिगत योजनांचे गट तयार करणे ;

(ग) बंधारे बांधणे, ते सुस्थितीत ठेवणे व त्यांचे जतन करणे यासाठी व इतर विहित उद्दिष्टांसाठी योजना तयार करणे ;

(ह) देशांतर्गत जलमार्गांचे नियमन करणे आणि अशा जलमार्गावरील अतिक्रमणे दूर करणे ;

(आय) पुन:प्रापण केलेल्या खार जमिनीवर अधिक चांगली लागवड करण्यासंबंधातील सर्व कामांवर देखरेख ठेवणे ;

(जे) पुन:प्रापण केलेल्या खार जमिनींच्या संरक्षणाच्या किंवा अधिक चांगल्या लागवडीच्या किंवा इतर लाभप्रद उपयोगाच्या प्रयोजनासाठी, कोणतीही खाडी, नदी किंवा इतर देशांतर्गत जलमार्ग पूर्णत: किंवा अंशत: बंद करण्यासाठी किंवा त्यांचे नियमन करण्यासाठी किंवा बांधकामासाठी किंवा पुनर्बांधणीसाठी तरतूद करणे ;

(के) पुन:प्रापण केलेल्या खार जमिनींमध्ये सिंचनविषयक सोयींची तरतूद करण्यासाठी कार्यक्रमांची तपासणी करणे, त्यांचा पाठपुरावा करणे व त्यांचे संनियंत्रण करणे ;

(ल) पुन:प्रापण केलेल्या खार जमिनींच्या अधिक चांगल्या लागवडीकरिता गोड्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी तरतूद करणे ;

(म) झाडेझुडपे काढून टाकणे आणि जमिनी समतल करण्यासाठी व अंतर्गत बंधारे बांधण्यासाठी किंवा त्यांची पुनर्बांधणी करण्यासाठी तरतूद करणे ;

(न) मासेमारी व मत्स्यसंवर्धन यांना मनाई करण्यासाठी किंवा त्यांचे नियमन करण्यासाठी किंवा त्यासाठी सुविधा निर्माण करण्यासाठी तरतूद करणे ;

(ओ) बंधाऱ्यांची हानी होण्यास कारणीभूत होणाऱ्या विवक्षित प्राण्यांचा धोका व उपद्रव यांचे नियंत्रण करणे ;

(प) भरतीच्या पाण्याखालील जमिनीचा मिठागरांसाठी विकास करणे, तशा उपयोगास मनाई करणे किंवा त्याचे विनियमन करणे ;

(क्यू) खार जमिनींच्या अधिक चांगल्या लागवडीसाठी व इतर प्रयोजनांसाठी संशोधन केंद्रे स्थापन करणे किंवा स्थापन करण्याची व्यवस्था करणे ;

(र) भरतीच्या पाण्याखालील जमिनी लागवडीखाली आणण्याच्या किंवा त्यांचा इतर लाभप्रद उपयोग करण्याच्या प्रयोजनासाठी त्यांचे पुन:प्रापण करणे ;

(स) सर्वसाधारणपणे, या अधिनियमाची उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा सर्व गोष्टी करणे.

४. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासनाने त्याला आवश्यक वाटेल इतक्या पुढील अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे :— खार जमीन विकास अधिकारी.

(अ) मुख्य अभियंते,

(ब) अधीक्षक अभियंते,

(क) कार्यकारी अभियंते,

(ड) सहायक अभियंते,

(इ) उप अभियंते,

(फ) उप-विभागीय अभियंते,

(ग) उप-विभागीय अधिकारी,

(ह) कक्ष अधिकारी किंवा कनिष्ठ अभियंते, आणि

(आय) इतर अधिकारी,

(२) पोट-कलम (१) खाली नेमलेल्या अधिकाऱ्यांना वरीलपैकी कोणतेही पदनाम किंवा राज्य शासन वेळोवेळी ठरवील अशी इतर पदनामे दिली पाहिजेत.

(३) राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या संबंधित अधिकारितेचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि खार जमीन विकास अधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या वर्गांनी आपल्या संबंधित अधिकारितेत पार पाडावयाची कर्तव्ये व वापरावयाचे अधिकार विनिर्दिष्ट करता येईल.

(४) अशा अधिकाऱ्याची आपसातील दुय्यमता राज्य शासनाकडून ठरविण्यात येईल, अशी असेल.

५. खार जमीन योजनांचे बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन यांच्याशी संबंधित व त्यांस आनुषंगिक किंवा पूरक अशा सर्व बाबींमध्ये मुख्य नियंत्रक प्राधिकारी, पाटबंधारे विभागाचा या विषयाचा प्रभारी मुख्य अभियंता किंवा राज्य शासनाकडून याबाबतीत पदनिर्दिष्ट करण्यात येईल असा इतर अधिकारी असेल. मुख्य नियंत्रक प्राधिकारी.

६. (१) कलम ३ खालील आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनास, वेळोवेळी, त्यास इष्ट वाटेल अशा क्षेत्रासाठी व अशा जमिनींसाठी, योजना तयार करण्याची व्यवस्था करता येईल. योजना तयार करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या योजनेमध्ये खालील तपशिलाचा अंतर्भाव असला पाहिजे :—

(अ) योजनेची उद्दिष्टे ;

(ब) योजनेच्या अंमलबजावणीसाठी संपादन करणे आवश्यक असलेल्या जमिनींच्या क्षेत्राची व्याप्ती ;

(क) योजना पूर्ण झाल्यानंतर पुनःप्रापण होण्याची आणि लाभ होण्याची शक्यता असलेल्या क्षेत्राची व्याप्ती ;

(ड) ज्यांच्या जमिनी संपादन करण्याची आवश्यकता आहे असे मालक, भोगवटादार किंवा धारक (शासन धरून) यांची नावे आणि त्यांचे भू-मापन क्रमांक ;

(ई) योजनेमुळे ज्यांच्या जमिनींना लाभ होणार असेल किंवा योजनेखाली ज्यांच्या जमिनींना संरक्षण मिळणार असेल असे मालक, भोगवटादार किंवा धारक (शासन धरून) यांची नावे व त्यांचे भूमापन क्रमांक ;

(फ) योजनेचे कार्य, कार्यक्षमतेने चालण्यासाठी जी बांधकामे बांधणे किंवा ठेवणे आवश्यक असेल अशा आणि इतर बांधकामांचा प्रकार ;

(ग) आराखड्यासंबंधीची तपशीलवार आरेखने व संरचनात्मक तपशील दर्शवणारी आरेखने यांसह योजनेच्या खर्चाचा तपशीलवार अंदाज ;

(ह) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

योजनेचा मसुदा आणि अंतिम योजना प्रसिद्ध करणे.

७. (१) लगतपूर्वीच्या कलमाखाली तयार करण्यात आलेली प्रत्येक योजना, योजनेमध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेल्या जमिनी जेथे असतील अशा गावात आणि तालुक्यातील मुख्यालयांमध्ये, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्रसिद्ध केली पाहिजे आणि योजनेला किंवा तिच्या कोणत्याही भागाला कोणतीही हरकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल अशा, योजनेचा परिणाम होणाऱ्या किंवा परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींना, त्यांच्या हरकती, जमिनी ज्या गावामध्ये असतील अशा गावामध्ये योजना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, योजनेमध्ये, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा खार जमीन विकास अधिकाऱ्यांकडे पाठवता येतील किंवा त्यांच्या समोर हजर होऊन त्यांना आपल्या हरकती लेखी सादर करता येतील.

(२) विनिर्दिष्ट खार जमीन विकास अधिकाऱ्याने त्याच्याकडे व्यक्तिशः करण्यात येतील अशा हरकती ऐकून घेतल्या पाहिजेत आणि त्यांच्याकडे लेखी सादर करण्यात आलेल्या हरकतींसह त्या विचारात घेतल्या पाहिजेत आणि आलेल्या हरकतींसह आपला अहवाल विहित करण्यात येईल किंवा येतील अशा वरिष्ठ खार जमीन विकास अधिकाऱ्यामार्फत किंवा अधिकाऱ्यांमार्फत, मुख्य नियंत्रक प्राधिकाऱ्याला सादर केला पाहिजे.

(३) हरकती आणि अहवाल आणि त्यावरील शिफारशी विचारात घेतल्यानंतर मुख्य नियंत्रक अधिकाऱ्याने, त्याला आवश्यक वाटतील अशा दुरुस्त्या किंवा शिफारशी करून त्यासह योजनेचा मसुदा मंजुरीसाठी राज्य शासनाला सादर केला पाहिजे.

(४) राज्य शासनाला, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, फेरफारासह किंवा फेरफाराशिवाय आणि त्यास लादणे योग्य वाटतील अशा शर्ती असल्यास त्या शर्तींना अधीन राहून योजनेला मंजुरी देता येईल किंवा योजनेला मंजुरी देण्याचे नाकारता येईल.

(५) लगतपूर्वीच्या पोट-कलमान्वये जर योजनेला मान्यता देण्यात आली असेल तर योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जमिनी ज्या गावामध्ये असतील अशा गावामध्ये आणि असा तालुक्याच्या मुख्यालयांमध्ये ती योजना, योजनेचा परिणाम होणाऱ्या सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली पाहिजे.

(६) हरकती विचारात घेताना, योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीला योजनेमुळे लाभ होतो किंवा नाही किंवा योजनेखाली ती संरक्षित होते किंवा नाही या प्रश्नावरील मुख्य नियंत्रक प्राधिकाऱ्यांचा निर्णय हा निर्णायक पुरावा असेल.

८. मंजूर करण्यात आलेली योजना, योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जमिनी ज्या गावात असतील अशा गावामध्ये लगतपूर्वीच्या कलमानुसार ज्या तारखेला प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकापासून अंमलता येईल आणि ती या अधिनियमाद्वारे अधिनियमित करण्यात आल्याप्रमाणे अंमलात येईल. योजनेचा प्रारंभ व परिणाम.

९. कोणतीही योजना अंमलात आल्यानंतर, संबंधित खार जमीन विकास अधिकाऱ्याने ह्या योजनेची अंमलबजावणी केली पाहिजे. योजनेची अंमलबजावणी.

१०. कोणतीही योजना अंमलात आल्यानंतर, कोणत्याही चुकीमुळे, अनियमिततेमुळे किंवा अनौपचारिकतेमुळे ती योजना सदोष आहे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे योजनेमध्ये बदल करणे आवश्यक आहे याबाबत राज्य शासनास त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून किंवा त्यास स्वतःहून तसे वाटेल तर,— योजनेमध्ये बदल करण्याचा अधिकार.

(अ) प्रस्तावित फेरफारामुळे योजनेच्या कोणत्याही महत्त्वपूर्ण तपशिलामध्ये बदल होत नाही असे राज्य शासनाचे मत होईल अशा बाबतीत, योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जमिनी जेथे असतील अशा गावामध्ये आणि अशा तालुक्याच्या मुख्यालयामध्ये, विहित रीतीने प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, राज्य शासनाला, फेरफाराला मंजुरी देता येईल.

(ब) प्रस्तावित फेरफारामुळे योजनेच्या कोणत्याही तपशिलामध्ये महत्त्वपूर्ण बदल होतो असे राज्य शासनाचे मत होईल अशा बाबतीत, राज्य शासनाला, असा फेरफार हा, जणू काही तो कलम ७, पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध करावयाचा योजनेचा मसुदा असल्याप्रमाणे, हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करता येईल ; आणि असा फेरफार हा जणू काही एक योजनाच असल्याप्रमाणे, त्याची मंजुरी, तो अंमलात येणे आणि त्याची अंमलबजावणी यासाठी कलमे ७, ८ व ९ च्या तरतुदी लागू होतील.

११. यापूर्वी यामध्ये काहीही अंतर्भूत करण्यात आले असले तरी, राज्य शासनाकडे अर्ज करण्यात आल्यावरून किंवा त्याच्याकडे प्रतिवेदन करण्यात आल्यावर, कोणतीही योजना चालू ठेवणे आर्थिकदृष्ट्या किंवा तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही किंवा कोणत्याही कृषीतर प्रयोजनासाठी किंवा मूळ योजनेमध्ये पूर्वकल्पना करण्यात आलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीच्या वापराच्या प्रयोजनात बदल करणे आवश्यक आहे किंवा लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे राज्य शासनास वाटले तर, राज्य शासनाला, विहित रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशाद्वारे, योजना रद्द करता येईल. अशा रीतीने योजना रद्द करण्यात आल्यावर, या अधिनियमाच्या तरतुदी, योजना रद्द करण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टी वगळून, या योजनेला लागू असण्याचे बंद होतील. योजना रद्द करण्याचा अधिकार.

१२. (१) एखादी योजना अंमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, त्या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संबंधात, मग त्या संपादन केलेल्या असोत किंवा लाभ मिळणाऱ्या असोत, योजना अंमलात आणणाऱ्या खार जमीन विकास अधिकाऱ्याने, अशा नोंदीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनी खार जमीन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत अशा आशयाची नोंद, अशा जमिनींशी संबंधित असलेल्या अधिकार अभिलेखामध्ये करण्याची व्यवस्था केली पाहिजे. अधिकार अभिलेख नसतील अशा बाबतीत, गावाच्या विहित अभिलेखामध्ये नोंद केली पाहिजे. अधिकार अभिलेखात नोंद करणे आणि जमिनीचा कृषीतर प्रयोजनांसाठी वापर करण्यावर निर्बंध घालणे.

(२) अशा योजनेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, योजनेच्या कार्यान्वयनामुळे ज्या जमिनीला ; ती लागवडयोग्य करून, लाभ करून देण्याचा प्रस्ताव होता अशी, योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली, कोणतीही जमीन, जिल्हाधिकाऱ्याला लादणे योग्य वाटेल अशा निर्बंधांच्या आणि शर्तींच्या अधीन ठेवून, अधिनियमांच्या तरतुदींनुसार, कृषीतर प्रयोजनासाठी वापरता येईल :

परंतु, अशा योजनेतील कोणतीही जमीन, अशा वापरासाठी केलेल्या अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या कमीत कमी पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागवडीखाली आणण्यात आली नसेल आणि अशा जमिनीच्या संबंधातील जिल्हाधिकारी निर्धारित करील अशी, राज्य शासनाला येणे असेल आणि देय असेल अशी संपूर्ण रक्कम (तशी रक्कम असल्यास) देण्यात आली नसेल तर, कोणतीही जमीन कृषीतर प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देता कामा नये.

(३) कोणत्याही योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली कोणतीही जमीन, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही कृषीतर प्रयोजनासाठी वापरण्यासाठी परवानगी देण्यात आली असेल तरी सुद्धा (त्या पोट-कलमान्वये तरतूद करण्यात आली त्याव्यतिरिक्त) अशी जमीन, जणू कांही अशी, परवानगी देण्यात आलेली नव्हती असे समजून, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन असण्याचे चालू राहील.

लागवड करण्यात किंवा उपकर भरण्यात कसूर केल्यास योजनेमधील जमिनीचा भाडेपट्टा जप्त होणे.

१३. जर कोणतीही व्यक्ती, एखाद्या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली कोणतीही जमीन भाडेपट्ट्याने धारण करीत असेल आणि योजनेमध्ये या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा लागोपाठच्या वर्षांच्या संख्येपेक्षा अधिक होईल इतक्या वर्षांपर्यंत, त्यामध्ये लागवड करण्यात तिने कसूर केली किंवा योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने तिचा वापर करण्यात कसूर केली किंवा या जमिनीच्या संबंधात देणे असेल अशी उपकराची रक्कम व काही शास्ती असल्यास त्या शास्तीसह राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत, राज्य शासनाकडे भरण्यात कसूर केली तर, जिल्हाधिकाऱ्याला, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार त्या जमिनीचा विनियोग करता येईल. त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासन असा भाडेपट्टा जप्त करून समाप्त करील आणि जिल्हाधिकाऱ्याने अन्यथा निदेश दिलेले नसतील तर, असा भाडेपट्टा अशा जमिनींच्या संबंधात, शासनाखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावाने त्यापूर्वी निर्माण केलेले सर्व अधिकार, भार आणि विमोचनाधिकार यांपासून मुक्त होईल :

परंतु, जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीला, तिच्याविरुद्ध करण्यात येणाऱ्या प्रस्तावित कार्यवाहीची कमीत कमी सहा महिन्यांची नोटीस दिल्याशिवाय आणि अशा कार्यवाहीविरुद्ध अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, जिल्हाधिकाऱ्याला, या कलमाखाली कोणताही आदेश काढता कामा नये.

बंधाऱ्यांचे पर्यवेक्षण, परिरक्षण व दुरुस्ती यासाठी ग्रामपंचायती जबाबदार असणे.

१४. (१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले यथास्थिति कोणतेही बंधारे किंवा इतर बांधकामे किंवा त्यांचा भाग यांवर पहारा ठेवणे, त्यांचे पर्यवेक्षण करणे, परिरक्षण करणे आणि दुरुस्त्या करणे आणि या योजनेची अंमलबजावणी करणारा खार जमीन विकास अधिकारी किंवा राज्य शासन वेळोवेळी देईल अशा निदेशांचे पालन करणे हे, उक्त अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या आणि असे बंधारे किंवा इतर बांधकामे ज्या क्षेत्रामध्ये आहेत अशा क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायतीचे कर्तव्य असेल. या प्रयोजनासाठी, त्याच्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी आणि त्याला देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यासाठी

१९५९ चा मुंबई ३.

त्याच्या मते वाजवीरीत्या आवश्यक असतील अशा, कलम १६ अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांखेरीज इतर अधिकारांचा ग्रामपंचायतीने वापर केला पाहिजे आणि असे उपाय योजले पाहिजेत किंवा योजण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) ग्रामपंचायतीने, तिची कर्तव्ये पार पाडताना आणि पहारा आणि सर्वसामान्य परिरक्षण करताना आणि दुरुस्त्या करताना आणि तिला देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करताना, केलेल्या खर्चासाठी, संबंधित खार जमीन विकास अधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी जी रक्कम निर्धारित करील अशी रक्कम राज्य शासनाकडून मिळण्याचा ग्रामपंचायतीला हक्क असेल.

(३) एखाद्या ग्रामपंचायतीने या कलमाद्वारे किंवा तद्न्वये लादण्यात आलेल्या कोणत्याही कर्तव्याचे पालन करण्यात कसूर केली तर, जिल्हाधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने, ग्रामपंचायतीने उक्त अधिनियमाखालील तिच्या कर्तव्याचे पालन करण्यात कसूर केली असल्याप्रमाणे, तिच्यावर, या अधिनियमान्वये योग्य ती कार्यवाही करणे हे कायदेशीर असेल.

१५. (१) सल्लागार समितीला स्वत: होऊन विचारात घेणे आवश्यक वाटतील अशा किंवा राज्य शासन सल्ला देण्यासाठी त्या तिच्याकडे पाठवील अशा या अधिनियमाच्या अंमलबजावणीतून किंवा या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेमधून किंवा या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विविध योजनांवरील बांधकामांच्या अंमलबजावणीच्या समन्वयामधून उद्‌भवणाऱ्या बाबींवर सल्ला देण्यासाठी राज्य शासनाला सल्लागार समिती स्थापन करता येईल. सल्लागार समिती.

(२) सल्लागार समितीचे सभापती आणि इतर सदस्य हे, राज्य शासनाने नेमले पाहिजेत आणि त्यांची संख्या, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील इतकी असेल आणि अशा रीतीने ते निवडण्यात येतील.

(३) सभापती आणि इतर सदस्य यांचा पदावधी, बैठकी घेण्याची रीत आणि सल्लागार समितीच्या बैठकींमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती या गोष्टींचे राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा रीतीने नियमन केले जाईल.

(४) सल्लागार समितीचे सभापती व इतर सदस्य (राज्य शासनाचा अधिकारी असलेला सदस्य वगळून) यांना सल्लागार समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी, राज्य शासन, वेळोवेळी निर्धारित करील अशा दरांनी प्रवास भत्ते व दैनिक भत्ते मिळतील.

१६. कोणतीही योजना तयार करण्याच्या, मंजूर करण्याच्या किंवा पार पाडण्याच्या किंवा कोणत्याही बंधाऱ्याचे किंवा बांधकामाचे पर्यवेक्षण करण्याच्या, परिरक्षण करण्याच्या किंवा दुरुस्ती करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा अन्य प्रकारे या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी प्रत्येक खार जमीन विकास अधिकाऱ्याला आणि राज्य शासनाने योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, जिल्हाधिकाऱ्याला किंवा संबंधित ग्रामपंचायतीला, कोणत्याही जमिनीच्या मालकाला, भोगवटादाराला किंवा धारकाला किंवा त्या जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या इतर व्यक्तीला, विहित करण्यात येईल अशी नोटीस दिल्यानंतर, अशा जमिनीवर प्रवेश करता येईल, तिची मोजणी करता येईल तिच्यावर, निशाणी करता येईल व उपरोक्त प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व कृती करता येतील. प्रवेश करण्याचा हक्क.

जमीन, हक्क किंवा हितसंबंध संपादन करणे.

**१७.** (१) जर कोणत्याही वेळी, राज्य शासनास असे आढळून आले की, कोणतीही जमीन किंवा कोणत्याही जमिनीमधील कोणत्याही व्यक्तीचा हक्क किंवा हितसंबंध, कोणत्याही योजनेच्या प्रयोजनासाठी, सक्तीने संपादन करणे आवश्यक आहे तर, राज्य शासनाने तशा आशयाची अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करणे हे कायदेशीर असेल. अशाप्रकारे प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना ही, भूमि संपादन अधिनियम, १८९४ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" १८९४ चा १. असा करण्यात आला आहे) त्याच्या कलम ६ अन्वये केलेली घोषणा असल्याप्रमाणे मानण्यात येईल, आणि ती जणू काही उक्त अधिनियमाच्या कलम ६ अन्वये करण्यात आल्याप्रमाणे, निर्णायक असेल आणि ती जमीन, हक्क किंवा जमिनीतील हितसंबंध हा उक्त अधिनियमाच्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याचे मानण्यात येईल.

(२) अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यावर जिल्हाधिकाऱ्याने अशा जमिनीचे, हक्काचे किंवा हितसंबंधाचे संपादन करण्यासाठी आदेश घेण्याची कार्यवाही केली पाहिजे आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदी संपादनाची रक्कम निर्धारित करणे, रकमेचे संविभाजन आणि यथास्थिति उक्त जमीन, हक्क किंवा हितसंबंध यांचे संपादन करण्याच्या संबंधातील इतर बाबी यांना, योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

(३) उक्त तरतुदी, अशा जमिनीच्या, हक्काच्या किंवा हितसंबंधाच्या संपादनाला जेथवर लागू होतात तेथवर, त्यांच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या सर्व बाबींसंबंधीचे नियम राज्य शासनाने तयार केले पाहिजेत.

(४) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संपादन करण्यात आलेली कोणतीही जमीन, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीची सलग तीन वर्षेपर्यंत पडीत राहिली असेल तर, अशा जमिनीचे बाजारमूल्य, तिच्यासंबंधातील देय असलेल्या वार्षिक आकारणीच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक आकारण्यात येता कामा नये.

आनुषंगिक नुकसानीसाठी भरपाईच्या रकमेची मागणी.

**१८.** (१) लगतनंतरच्या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी संपादन केलेल्या जमिनीखेरीज इतर कोणतीही जमीन, किंवा मासेमारीचा अधिकार, जलनिस्सारणाचा हक्क, पाणी वापरण्याचा हक्क किंवा मालमत्तेचा इतर हक्क यांवर या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा पार पाडलेल्या कोणत्याही योजनेमुळे क्षतिकारक रीतीने परिणाम झाला असेल तर, अशी मालमत्ता किंवा हक्क जिच्याकडे निहित असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, संपादनाच्या रकमेसाठी, जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी दावा दाखल करता येईल आणि, त्यानंतर भूमि संपादन १८९४ चा १. अधिनियम, १८९४ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या तरतुदी, शक्य तेथवर रक्कम निर्धारित करणे, तिचे संविभाजन आणि प्रदान यांना योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(२) या कलमाअन्वयेचा जर कोणताही दावा, ज्या कोणत्याही बांधकामामुळे अशा कोणत्याही हक्कावर क्षतिकारक परिणाम झाला असेल ते बांधकाम पूर्ण झाल्यापासून दोन वर्षांच्या कालावधीनंतर दाखल करण्यात आला असेल तर, तो दाखल करून घेतला जाणार नाही.

१९. कोणताही बंधारा बांधण्यासाठी किंवा त्याच्या दुरुस्तीसाठी लागणारी माती किंवा इतर सामग्री मिळवण्याच्या प्रयोजनासाठी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी ज्या कोणत्याही जमिनीचा उपयोग करण्यात आला असेल ती जमीन, अशा प्रयोजनासाठी, राज्य शासनाच्या अखत्यारात होती असे मानण्यात येईल आणि अशी माती किंवा इतर सामग्री वापरण्यासाठी किंवा ती काढून नेण्यासाठी कोणतीही रक्कम देण्यात येणार नाही.
विवक्षित प्रकरणांत माती वापरणे किंवा ती काढून नेणे याबद्दल भरपाई न देणे.

२०. खार जमिनींच्या संबंधातील योजनांची अंमलबजावणी करणे व त्यांवरील सर्वसाधारण देखरेख यांवरील खर्चाचा हिस्सा भागवण्याच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमात " खार जमिनींच्या संबंधातील उपकर " किंवा " उपकर " असा निर्देश करण्यात आलेला जमिनीवरील कर, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने, बसवण्यात व गोळा करण्यात येईल.
खार जमिनींवरील उपकर.

२१. अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा करारात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन, खार जमिनींच्या संबंधात देय असलेल्या कोणत्याही जमीन महसुलाव्यतिरिक्त, कोणत्याही योजनेमुळे फायदा होणाऱ्या अशा खार जमिनीसंबंधात, अशी योजना ज्या तारखेपासून अंमलात आली असेल त्या तारखेपासून किंवा राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, अशा नंतरच्या तारखेपासून व अशा कालावधीसाठी आणि दर हेक्टरला चाळीस रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दराने, उपकर बसवण्यात व तो वसूल करण्यात येईल. निरनिराळ्या खार जमिनींच्या संबंधात किंवा निरनिराळ्या योजनांच्या संबंधात किंवा निरनिराळ्या क्षेत्रांच्या संबंधात, निरनिराळ्या तारखा, निरनिराळे कालावधी व दर विहित करता येतील.
खार जमिनींवर उपकर बसवणे.

२२. असा उपकर हा, ज्या जमिनीच्या बाबतीत तो बसवण्यात आला असेल, अशी जमीन प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या व्यक्तीकडून प्रथमत: देय असेल. उपकर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने असा उपकर देण्यात कसूर केल्यास असा उपकर, अशा जमिनीच्या बाबतीत अधिनियमान्वये जमीन महसूल देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून वसुली योग्य असेल.
उपकर देण्याच्या बाबतीतील जबाबदारी.

२३. या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी जेथवर विसंगत असतील त्याव्यतिरिक्त, निकट पूर्ववर्ती कलमान्वये या अधिनियमाखालील उपकर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीकडून उक्त उपकर, जणू तो उक्त संहितेखाली देय असलेला जमीन महसूल असल्याप्रमाणे, गोळा करण्याच्या व वसूल करण्याच्या प्रयोजनास उक्त संहितेच्या तरतुदी लागू असतील.
उपकर गोळा करणे व त्याची वसुली यांसाठी संहितेच्या तरतुदी लागू असणे.

२४. देय असलेली उपकराची रक्कम देण्याबाबतची नोटीस बजावण्यात आल्यानंतर उपकर देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत असा उपकर देण्यात कसूर केली तर, अशी कसुरी त्याने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय केली होती याबद्दल खात्री झाल्यावर, विहित प्राधिकाऱ्यास, असा प्राधिकारी ठरवील त्याप्रमाणे, अशा व्यक्तीवर, देण्यात न आलेल्या उपकराच्या रकमेच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम शास्ती म्हणून लादता येईल. अशी शास्तीची रक्कम ही, उपकराच्या रकमेच्या वसुलीसाठी तरतूद केलेल्या रीतीनेच वसुलीयोग्य असेल.
उपकर देण्यातील कसुरीबद्दल शास्ती.

उपकराची थकबाकी व शास्ती ही जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे.

**२५.** या अधिनियमान्वये देय असलेल्या उपकराच्या व शास्तीच्या सर्व रकमा, वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस बाध न आणता, संबंधित जमिनीच्या जप्तीसह, उक्त संहितेच्या कलम १७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीपैकी कोणत्याही पद्धतीने, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली-योग्य असतील.

तातडीने करणे आवश्यक असलेल्या दुरुस्त्या किंवा आवश्यक असलेली कामे पार पाडण्यासाठी विवक्षित व्यक्तींना सक्ती करण्याचे अधिकार.

**२६.** (१) या कलमान्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यास राज्य शासनाकडून अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही खार जमीन विकास अधिकाऱ्यास जेव्हा जेव्हा असे आढळून येईल की,—

(अ) काही विशेष दुरुस्त्या तातडीने करण्यात आल्या नाहीत तर, कोणत्याही बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल व त्यामुळे मालमत्तेची तसेच माणसे किंवा प्राणी यांची अकस्मात व मोठ्या प्रमाणावर हानी होईल व त्यांना इजा पोचेल;

(ब) असे नुकसान किंवा अशी इजा टाळता यावी म्हणून, अशा दुरुस्त्या, अडथळे दूर करणे आणि साफ करण्याचे काम करण्यासाठी जी सर्वसाधारण मुदत देता येईल अशा त्या मुदतीत त्या दुरुस्त्या, अडथळे दूर करणे आणि साफ करण्याचे काम तत्परतेने करण्यासाठी आवश्यक तेवढे कामगार मिळत नसतील तेव्हा, खार जमीन विकास अधिकाऱ्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याने जाहीर केलेल्या लेखी आदेशाद्वारे, अशा दुरुस्त्या, अडथळे दूर करणे किंवा असे काम ज्या ठिकाणी करण्यात यावयाचे असेल अशा लोकवस्तीच्या परिसरात, जी जमीन धारण करीत असेल किंवा अशी जमीन ज्याच्या कब्जात असेल किंवा जो त्या ठिकाणी रहात असेल अशा प्रत्येक धडधाकट पुरुषास आणि जिचे नाव पोट-कलम (४) अन्वये तयार करण्यात आलेल्या यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे अशा प्रत्येक इतर व्यक्तीस ताबडतोब कामावर जाण्याबाबत व खार जमीन विकास अधिकाऱ्यास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस आवश्यक वाटेल अशा रीतीने व अशा कालावधीत, अशा दुरुस्त्या, अडथळे दूर करणे आणि असे काम करण्यासाठी त्या खार जमीन विकास अधिकाऱ्याला सहाय्य करण्याबाबत, निदेश देता येईल.

(२) खार जमीन विकास अधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशासंबंधी मुख्य नियंत्रण प्राधिकाऱ्यास ताबडतोब कळविले पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निदेशानुसार जिने काम केले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस खार जमीन विकास अधिकारी ठरवील त्याप्रमाणे त्याच प्रकारच्या कामासाठी त्यावेळी त्या भागात देण्यात येणाऱ्या कमाल दरापेक्षा कमी नसेल अशा दराने पारिश्रमिक देण्यात येईल.

(४) याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने प्रत्येक योजनेच्या संबंधात, खार जमीन विकास अधिकाऱ्याने पोट-कलम (१) खाली कामावर बोलवावयाच्या व्यक्तींची यादी तयार करून त्या यादीमध्ये, ज्या व्यक्तींची तीमध्ये आपला समावेश करून घेण्याची इच्छा असेल किंवा ज्या व्यक्तींचा त्यांच्या व्यवसायामुळे, आजीविकेमुळे किंवा नोकरीमुळे त्यात समावेश करता येईल अशा व्यक्तींचा समावेश केला पाहिजे.

(५) कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय, पोट-कलम (१) अन्वये तिला दिलेल्या कोणत्याही कायदेशीर निदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास तिला, अपराध सिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

मासेमारी विषयक अधिकारांचे नियमन.

२७. (१) कोणतीही रुढी, परिपाठ, कायदा किंवा संविदा यात एतद्विरुद्ध काहीही असले तरी,

(अ) कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही बंधाऱ्यात किंवा त्याच्या भागात, १५ मीटर अंतराच्या आत मासेमारी करता कामा नये किंवा मासेमारीच्या अधिकारांचा वापर करता कामा नये.

(ब) कोणत्याही व्यक्तीने खार जमीन विकास अधिकाऱ्याने दिलेल्या लायसन अन्वये असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही योजनेत समाविष्ट असलेल्या किंवा अशा योजनेच्या लगत असलेल्या कोणत्याही अंतर्गत जलमार्गामध्ये किंवा कोणत्याही खाडीस बांध घालून किंवा अन्य रीतीने निर्माण केलेल्या आणि पिकाच्या लागवडीसाठी वापरण्यात न येणाऱ्या, जलाशयात, मासेमारी करता येणार नाही किंवा मासेमारीच्या अधिकारांचा वापर करता कामा नये.

(२) पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये देण्यात येणारे कोणतेही लायसन हे विहित करण्यात येईल अशी फी दिल्यावर, विहित करण्यात येतील असे निर्बंध व अटी यांच्या अधीन आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात दिले पाहिजे व त्यात, विहित करण्यात येईल असा तपशील असला पाहिजे.

संक्षिप्तरीत्या चौकशी करणे.

२८. (१) या अधिनियमान्वये करावयाची कोणतीही चौकशी ही, उक्त संहिते अन्वये संक्षिप्त चौकशी करण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने केली पाहिजे आणि संक्षिप्त चौकशी करण्यासंबंधात उक्त संहितेत अंतर्भूत असलेल्या सर्व तरतुदी शक्य असेल तितक्या मर्यादेपर्यंत लागू होतील.

(२) अशी चौकशी करणाऱ्या व्यक्तीस, कोणत्याही व्यक्तीस बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे, तसेच तिची शपथेवर तपासणी करणे आणि कागदपत्रे सादर करण्यास भाग पाडणे या संबंधात उक्त संहिते अन्वये महसूल अधिकाऱ्यांकडे जे अधिकार निहित असतात ते अधिकार असतील.

योजनेशी संबंधित असलेली कागदपत्रे, आराखडा किंवा नकाशा यांची नोंदणी करणे आवश्यक नसणे.

१९०८ चा १६. २९. (१) कलम १२ च्या तरतुदींच्या अधीन राहून, नोंदणी अधिनियम, १९०८ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यातील कोणत्याही गोष्टीमुळे, जी अंमलात आलेली असेल अशा योजनेच्या संबंधात तयार करण्यात आलेल्या किंवा मंजुरी देण्यात आलेल्या कोणत्याही कागदपत्रांची, आराखड्यांची किंवा नकाशांची नोंदणी करणे आवश्यक आहे असे मानण्यात येणार नाही.

(२) उक्त अधिनियमाची कलमे ४८ व ४९ यांच्या प्रयोजनार्थ, अशा सर्व कागदपत्रांची, आराखड्यांची व नकाशांची त्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नोंदणी करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

सद्‌भावनेने कृत्य करणाऱ्या व्यक्तीस संरक्षण.

३०. (१) या अधिनियमान्वये किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमांन्वये किंवा दिलेल्या आदेशांन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टींच्या संबंधात, या अधिनियमान्वये, यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(२) ज्याविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल अशा कृत्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत दावा किंवा खटला दाखल करण्यात आला नसेल तर, या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करावयाचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, या अधिनियमान्वये यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध, कोणताही दावा किंवा खटला दाखल करता येणार नाही.

शास्ती. **३१.** जी कोणतीही व्यक्ती, अंमलात आलेल्या योजनेच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील किंवा अशा कोणत्याही उल्लंघनास कारणीभूत ठरेल किंवा या योजनेखाली करण्यात आलेल्या कामांपैकी कोणत्याही कामांच्या नुकसानीस कारणीभूत ठरेल असे कोणतेही कृत्य करील किंवा कलम २७ च्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा त्या कलमान्वये दिलेल्या लायसनच्या शर्तींचे पालन करण्यात कसूर करील किंवा या अधिनियमान्वये आपल्या अधिकारांचा योग्य वापर करताना किंवा आपली कर्तव्ये पार पाडताना कोणत्याही व्यक्तीस किंवा प्राधिकाऱ्यास अडथळा करील किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला, अपराध सिद्धीनंतर एक वर्षाच्या मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

नियम. **३२.** (१) राज्य शासनाकडून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमान्वये नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करण्यात येईल.

(२) या अधिनियमात इतरत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न येता, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा यथास्थिति, येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती. **३३.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस, मुंबई खार जमीन अधिनियम, १९४८ हा निरसित होईल. १९४८ चा मुंबई ७२.

(२) अधिनियम अशारीतीने निरसित झाल्यावर, निरसित केलेल्या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले मंडळ, विसर्जित होईल व त्याचे सभापती आणि सदस्य यांनी आपापली पदे सोडली पाहिजेत ;

तसेच, मंडळ अशारीतीने विसर्जित करण्यात आल्यावर, मंडळाची मत्ता, अधिकार व दायित्वे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून राज्य शासनाची मत्ता, अधिकार व दायित्वे होतील.

(३) निरसित अधिनियमान्वये यथास्थिति करण्यात आलेली, काढण्यात आलेली किंवा देण्यात आलेली आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेली, कोणतीही योजना, कोणतेही लायसन, परवानगी, नेमणूक, नियम, उप-विधि, विनियम, नोटीस, अधिसूचना किंवा आदेश, तो या अधिनियमाच्या तरतुदींशी जेथवर विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमान्वये करण्यात आल्याचे, काढण्यात आल्याचे किंवा देण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्यात, या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून यथोचित फेरबदल करण्यात येईपर्यंत किंवा ते रद्द करण्यात येईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

(४) अधिनियमाच्या अशा निरसनामुळे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी संपादन करण्यात आलेल्या किंवा मिळालेल्या कोणत्याही अधिकारास, आबंधनास किंवा दायित्वास किंवा कोणत्याही व्यक्तीस झालेल्या कोणत्याही शास्तीस किंवा तिच्या कोणत्याही जप्तीस किंवा अशा कोणत्याही अधिकाराच्या, आबंधनाच्या, दायित्वाच्या, शास्तीच्या किंवा जप्तीच्या बाबतीतील कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीस किंवा उपाययोजनेस कोणतीही बाधा येणार नाही आणि अशी कोणतीही कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना जणू काही हा अधिनियम अधिनियमित करण्यात आलेला नसल्याप्रमाणे दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात राहील, तसेच अशी कोणतीही शास्ती किंवा जप्ती लादता येईल व त्याप्रमाणे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी निरसित अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीकडून येणे असलेली अंशदानाची किंवा अर्जाची कोणतीही रक्कम ही, राज्य शासनास देय असलेली रक्कम असल्याचे व ती त्याच्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असल्याचे मानण्यात येईल.

१९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश २.

३४. (१) महाराष्ट्र खार जमिनी विकास अध्यादेश, १९७९ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश २ चे निरसन व व्यावृत्ती.

(२) अध्यादेश अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही ही (केलेली कोणतीही नेमणूक किंवा केलेला कोणताही नियम, काढलेला कोणताही आदेश किंवा काढलेली कोणतीही अधिसूचना यांसह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केलेली गोष्ट किंवा कार्यवाही किंवा नेमणूक किंवा, यथास्थिति, केलेला नियम किंवा काढलेला आदेश किंवा काढलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.